राम नाईक
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com

**कृपया प्रसिध्दीसाठी** **22 सप्टेंबर 2008**

## वाजपेयी सरकारने उत्खननासाठी दिलेल्या भूभागातून व्यापारी तेल उत्पादनाबाबत राम नाईक समाधानी

**मुंबई, सोमवार :** "वाजपेयी सरकारने भारताचा कच्च्या तेलाचा साठा वाढवा यासाठी नव-नवे भूभाग उत्खननासाठी देण्याचा जो निर्णय घेतला तो किती योग्य होता हेच आता रिलायन्सने व्यापारी तत्वावर सुरु केलेल्या कच्च्या तेलाच्या उत्पादनामुळे सिध्द झाले आहे," अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज व्यक्त केली.

कच्चे तेल व नैसर्गिक वायू यांचा साठा आहे किंवा काय याबाबत उत्खनन करण्यासाठी देशातील विविध ठिकाणचे भूभाग वेगवेगळया आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्यांना श्री. नाईक यांच्याकडे पेट्रोलियम मंत्रालय असताना देण्यात आले होते. त्यापैकी कृष्णा - गोदावरी येथील भूभाग रिलायन्स कंपनीला देण्यात आले होते. आता त्याच ठिकाणी मिळालेल्या कच्च्या तेलाचे व्यापारी उत्पादन सुरु झाल्याबद्दल श्री. नाईक यांनी आनंद व्यक्त केला असून रिलायन्सचे श्री. मुकेश अंबानी यांचे अभिनंदनही केले आहे " या नव्या साठयातून आता व्यावसायिक उत्पादन सुरु झाल्याने देशाच्या अर्थकारणात मोठ्या प्रमाणावर चांगले बदल होतील," अशी आशाही श्री. नाईक यांनी व्यक्त केली आहे. हे उत्पादन मोठया प्रमाणावर असल्याने तेल व नैसर्गिक वायुबाबत देशाचे परावलंबित्वही काही प्रमाणात कमी होईल, ही सर्वाधिक समाधानाची बाब आहे, अशी प्रतिक्रियाही श्री. नाईक यांनी व्यक्त केली आहे.

**(कार्यालय सचिव)**

निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फैक्स : 022-2842 33 99